# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत १० वा मजला,शासकीय वसाहत,वांद्रे (पूर्व), मुंबई- ५१
दूरध्वनी--२६५५६७९९ फॅक्स २६५५६८०५ इ-मेल : collectormsd@gmail.com

तक्रार क्र. ९३७

क्र.सी/कार्या-२आय/टे-८/कावि-८१/२०२०
दिनांक : २४/०३/२०२१

प्रति,
मा. विभागीय आयुक्त,कोंकण विभाग,
कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

**विषय :** **कांदळवन ऱ्हासाबाबत..**
मौजे कांजूरमार्ग, विक्रोळी, कन्नमवारनगर, SWD नाला शेजारी, मुंबई-आग्रा रोड, विक्रोळी पूर्व याठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास होत असलेबाबत...

**संदर्भ :** १. श्री. अंकुशदादा वसंत कुराडे, स्वाभीमानी भारतीय पॅंथर यांचा ई मेल संदेश दि.२७/१०/२०२० .
२. उपविभागीय अधिकारी, मुंबई पुर्व उपनगरे यांचा अहवाल दि. ०४/०२/२०२१.

प्रस्तुत प्रकरणी श्री. अंकुशदादा वसंत कुराडे, स्वाभीमानी भारतीय पॅंथर यांची कांदळवन ऱ्हासाबाबतची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ व दिनांक १७/०९/ २०१८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर तक्रारीबाबत चौकशी केली असून त्याबाबतचा विहीत नमुन्यातील अहवाल खालीप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| ०१ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. अंकुशदादा वसंत कुराडे, स्वाभीमानी भारतीय पॅंथ दि.२७/१०/२०२० . |
| ०२ | तक्रारीचा विषय | मौजे कांजूरमार्ग, विक्रोळी, कन्नमवारनगर, SWD नाला शेजारी, मुंबई-आग्रा रोड,विक्रोळी पूर्व याठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास होत असलेबाबत... |
| ०३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील उदा: स.नं. , गावाचे नाव, तालुका. | मौजे कांजूरमार्ग ता. कुर्ला स.नं. २७५पै. |
| ०४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | १. श्रीम. सुजाता काळे, मंडळ अधिकारी, घाटकोपर<br>२. श्रीम. नंदा मूकणे, तलाठी कांजूर<br>३. श्री. उत्तम केंद्रे, परिरक्षण भूमापक कांजूर<br>४. श्री. सागरे, वनरक्षक कांजूर |
| ०५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | विषयांकित प्रकरणी मंडळ अधिकारी, घाटकोपर व तलाठी कांजूर व इतर अधिकारी यांनी स्थळ पंचनामा केला आहे. त्यानूसार तक्रारीत नमूद जागा ही मौजे कांजूर ता. कुर्ला येथील स.नं.२७५ मिळकतीमधील आहे. सदर जागेची तक्रारदार यांच्या समवेत स्थळपाहणी केली असता तक्रारदार यांनी दाखविलेली जागा ही कन्नमवारनगर, SWD नाला शेजारी, मुंबई-आग्रा रोड,विक्रोळी पूर्व येथे असून मौजे कांजूर मधील स.नं. २७५ मध्ये येत आहे.<br>सदर ठिकाण मुंबई आग्रा रोडच्या पूर्व बाजूस असून त्यामधून मुंबई महानगरपालिकेचा नाला वाहत आहे. त्या नाल्याच्या दोन्ही बाजूस कांदळवन असून सदर जागा वन विभागाच्या ताब्यात असल्याचे हजर वनरक्षक श्री. सागरे यांनी सांगितले. पाहणीवेळी |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | असे निदर्शनास आले की, सदर नाल्यातून मुंबई महानगरपालिका यांचेमार्फत गाळ काढण्याचे काम सुरु होते व त्या कामासाठी तेथे जे.सी.बी. , डंपर व बाहेर काढलेला गाळ होता. तसेच तेथे जागेवर काही ठिकाणी रॅबिट टाकण्यात आल्याचे दिसून आले. सदर ठिकाणी मुंबई आग्रा रोडला लागून वन विभाग यांचेमार्फत संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरु होते.<br>तक्रारदार यांनी तक्रार अर्जात नमूद कंपनीवर गुन्हे दाखल करावे असे नमूद केले आहे. परंतु स्थळपाहणीवेळी सदर कंपनीचे कोणीही व्यक्ती जागेवर हजर नव्हते. तसेच नाल्यामध्ये कोणताही कचरा, गाळमिश्रित पाणी दिसून आले नाही. सदर नाल्यातील पाणी पुढे कांदळवनातून वाहत असल्याचे दिसून आले. परंतु नाल्यात तक्रारदार यांनी दाखविलेल्या ठिकाणी प्रत्यक्षात जाण्यसाठी पायवाट व रस्ता नसल्याने तेथे जाणे शक्य झाले नाही. तसेच तेथे कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नाही.<br>सदर प्रकरणी वन विभागाचे श्री. साखरे यांना सदर घटनेबाबत विचारणा केली असता, सदर जागा ही वन विभागाच्या ताब्यात असून तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीवरुन जागेवर असलेल्या गाडीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही असे सांगितले. तसेच तक्रारींत नमूद जागा ही वन विभागाच्या ताब्यात असल्याने त्याचे संरक्षण वन विभागामार्फत होणे आवश्यक आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर यांनी केला आहे. |
| ०६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | नाही. |
| ०७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबधित पोलिस ठाण्याचे नाव | निरंक |
| ०८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्याक्तीचीं नावे व पत्ता | निरंक |
| ०९ | कोणत्या कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | निरंक |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत पंचनामा, उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर यांचेकडील अहवाल व अनुषंगीक कागदपत्रे पृष्ठ क्र. ०१ ते........पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर केलेली आहेत.

( डॉ. विकास नाईक )
**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा**

**स्थळ प्रतिवर मा. समन्वय अधिकारी, कां.सं.सं.स.समिती**
**तथा अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची सही असे.**

प्रत : मा. सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवन संरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर.

D:\Swapnil Data Backup २1\०१.०१.२०२१\Mangroves complaints\कुर्ला\श्री. अंकुशदादा कुराडे स्वाभीमानी भारतीय पॅथर.docx

Scanned by CamScanner

# उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

निळकंठ बिझनेस पार्क, ए बिल्डींग, तळ मजला, किरोळ रोड, विद्याविहार (पश्चिम), मुंबई-४०००८६

ई मेल-sdoeasternsuburban@gmail.com दुरध्वनी क्रमांक : २५१११११२६


क्र. उविअ/पू.उ/टे-१/त.क्र.-१६/कावि-५१/२०२०
दिनांक :- ०४.०२.२०२१ आ.क्र.०७८

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

मा/२१/७०८३/ 11/02/2021 आ.शा. 23414

FEB 2021

**विषय:-** जाणीवपूर्वक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नाल्यात कचरा टाकून, संरक्षित कांदळवनाच्या ऱ्हासास कारणीभूत असलेल्या DOGUS SOMA JV, या कंपनीवर भारतीय दंड संहिता व इतर कायदयानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दयावेत.

**संदर्भ:-** १) आपलेकडील ई-मेल दि.२९.१०.२०२०.
२) तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचेकडील अहवाल पत्र क्र.तह/कुर्ला/जमीन/कावि- १३१/२०२० दि.२१/१०/२०२०.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त झालेल्या अहवालानुसार पुढीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहोत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दि. ०६.१०.२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दि. १७.०९.२०१८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढील नमुन्यामध्ये सादर करीत आहोत.

| अ.क्र | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | तक्रारदाराचे नाव व तक्रारीचा दिनांक | श्री. अंकुशदादा वसंत कुराडे दि. २७.१०.२०२० |
| 2 | तक्रारीचा विषय | मौजे- कांजूरमार्ग, विक्रोळी, कन्नमवार नगर, SWD नाला शेजारी, मुंबई आग्रा रोड, विक्रोळी पूर्व या ठिकाणी कांदळवनाचा -हास होत असलेबाबत. |
| 3 | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा-स.नं.गावाचे नाव, तालुका | मौजे- कांजूर, ता. कुर्ला स. नं. २७५ पै. |
| 4 | चौकशी करण्या-या अधिका-याचे नाव व पदनाम | १) श्रीम. सुजाता काळे, मंडळ अधिकारी, घाटकोपर,<br>२) श्रीम. नंदा मुकणे, तलाठी कांजूर<br>३) श्री. उत्तम केंद्रे, परिरक्षण भूमापक कांजूर<br>४) श्री. सागरे, वनरक्षक कांजूर |
| 5 | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | उपरोक्त तक्रारीत नमूद जागा ही मौजे कांजुर, तालुका कुर्ला येथील स. नं. 275 पै. मधील आहे. सदर जागेची तक्रारदार यांच्यासमवेत स्थळ पाहणी केली असता तक्रारदार यांनी दाखविलेली जागा ही कन्नमवार नगर, SWD नाल्याच्या शेजारी, मुंबई-आग्रा रोड, विक्रोळी पूर्व येथे येत असून मौजे कांजुर मधील स. नं. 275 मध्ये येत |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | आहे. सदर ठिकाण मुंबई आग्रा रोडच्या पूर्व बाजूस असून त्यामधून मुंबई महानगरपालिकेचा नाला वाहत आहे. त्या नाल्याच्या दोन्ही बाजूस कांदळवन असून सदर जागा वन विभाग यांचे ताब्यात असल्याचे तेथे हजर असलेल्या वनरक्षक श्री. सागरे यांनी सांगितले. पाहणीवेळी तेथे निदर्शनास आले की, सदर नाल्यातून मुंबई महानगरपालिका यांचेमार्फत गाळ काढण्याचे काम सुरू होते व त्या कामासाठी तेथे जेसीबी व डंपर होते व गाळ बाहेर काढण्यात आलेला होता. तेथे काही जागेवर रॅबिट टाकण्यात आल्याचे दिसून आले. तसेच सदर ठिकाणी मुंबई आग्रा रोडला लागून वन विभाग यांचेमार्फत संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरू होते<br>तक्रारदार यांनी तक्रार अर्जात नमूद कंपनीवर गुन्हे दाखल करावे असे नमूद केले आहे परंतु स्थळपाहणीवेळी सदर कंपनीचे कोणीही व्यक्ती जागेवर हजर नव्हते. तसेच नाल्यांमध्ये कोणताही कचरा, गाळमिश्रीत पाणी दिसून आले नाही. सदर नाल्यातील पाणी पुढे कांदळवनातून वाहत असल्याचे दिसून आले. परंतु नाल्यात तक्रारदार यांनी दाखविलेल्या ठिकाणी प्रत्यक्षात जाण्यासाठी पायवाट व रस्ता नसल्याने तेथे जाणे शक्य झाले नाही. तसेच तेथे कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नाही. वन विभागाचे श्री. साखरे यांना सदर घटनेबाबत विचारणा केली असता सदर जागा वन विभागाच्या ताब्यात असून तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीवरून जागेवर असलेल्या गाडीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही असे सांगितले.<br>प्रकरणी तक्रारीत नमूद जागा ही वन विभागाचे ताब्यात असल्याने त्याचे संरक्षण वन विभाग यांचेमार्फत होणे आवश्यक आहे. |
| 6 | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | नाही. |
| 7 | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्र. दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | नाही. |
| 8 | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांचेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे, त्या व्यक्तींची नावे व पत्ता | नाही. |
| 9 | कोणत्या कायद्या अंतर्गत / कलमांतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | नाही. |

उक्त प्रकरणी विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील योग्य ती कार्यवाही करणेचे निर्देश दिले आहेत. प्रकरणी संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचेकडील अहवाल व त्यासमवेत प्राप्त मंडळ अधिकारी, घाटकोपर यांचा अहवाल, संयुक्त स्थळपाहणी पंचनामा, जबाब यांच्या छायाप्रतीसह प्रस्तुत प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर करणेत येत आहे.

उपविभागीय अधिकारी
पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा

Scanned by CamScanner

# मंडळ अधिकारी घाटकोपर व तलाठी यांचे कार्यालय

टोपीवाला कॉलेज कंम्पाऊंड, सरोजिनी नायडू रोड, मुलुंड (प.), मुंबई – ४०००८०

क्र.मं.अ./घाटकोपर/कांदळवन/बा.क्र.-११७ /२०२०
दिनांक :- १८/१२/२०२०

मा. तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचे हुजुरास
सविनय अहवाल सादर

विषय :- जाणीवपुर्वक बृन्हमुंबई महानगरपालिकेच्या नाल्यात कचरा टाकून, संरक्षित कांदळवनाचा -हासास कारणीभूत असलेल्या DOGUS SOMA JV या कंपनीवर भारतीय दंड संहिता व इतर कायद्यानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश द्यावेत.

संदर्भ:- १) मा.जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचेकडील ई-मेल दि.२८/१०/२०२०
२) मा.उपविभागीय अधिकारी पुर्व उपनगरे, मुंबई उपनगर यांचेकडील क्र. उविअ/पूउ/टे-१/ कांदळवन/त.क्र.१६/कावि-५०१/२०२० दि.०२/११/२०२० जा.क्र. ५३५
३) आपलेकडील पत्र क्र.तह/कुर्ला/जमीन/कावि-३६२/२०२० दि.०९/१०/२०२०
४) श्री. अंकुशदादा वसंत कुराडे, राष्ट्रीय अध्यक्ष स्वाभिमानी भारतीय पँथर यांचेकडील ई-मेलद्वारे प्राप्त तक्रार दि.२७/१०/२०१८

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रान्वये तक्रारदार श्री. अंकुशदादा वसंत कुराडे, राष्ट्रीय अध्यक्ष स्वाभिमानी भारतीय पँथर यांचेकडील ई-मेलद्वारे तक्रार प्राप्त झालेली आहे. सदर अर्जात तक्रारदार यांनी मौजे-कांजूर तालुका-कुर्ला येथील कन्नमवार नगर, SWD नाल्याच्या शेजारी, मुंबई आग्रा रोड, विक्रोळी पुर्व, मुंबई- ८३ या ठिकाणी अवैधरित्या कांदळवनाचा -हास करत असलेबाबत तक्रार केलेली आहे. सदर ठिकाणी अंडरग्राउंड मुंबई मेट्रो लाईनच्या जमिनीखालील खोदकाम करताना तयार झालेला दगडाचा गाळ असून जमिनीखाली ड्रील करताना कठोर दगडाचा बारीक भुगा व गाळमिश्रीत पाणी, कचरा सदर मुंबई महानगरपालिकेचे नाल्यात टाकण्यात आला आहे. सदरचे गाळमिश्रीत पाणी, कचरा नाल्यातील पाण्यावरोबर कांदळवन क्षेत्रातुन वाहत जाते त्यामुळे सदर गाळमिश्रीत पाणी, कचरा कांदळवनाच्या मुळाशी जावून जमा होत असल्याने सदर कांदळवनास पाणी पुरवठा होत नसल्यामुळे सदरच्या कांदळवनाचा -हास होत आहे.असे अर्जदार यांचे म्हणणे आहे. तसेच त्यांनी दि. ०५/०३/२०२० रोजी सदर घटनेची तक्रार वन विभागाच्या निर्दशनास आणून दिलेली होती असेही अर्जात नमुद केलेले आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.०४/१२/२०२० रोजी तालुका स्तरीय सागर तटीय सनियंत्रण समितीमार्फत प्रत्यक्ष संयुक्त स्थळपाहणी करण्याकरीता तलाठी कांजुर, वन विभागाचे वनरक्षक, नगर भुमापन कार्यालय मुलुंडचे प्र. भुमापक, मुंबई महानगर पालिकेचे कर्मचारी व तक्रारदार श्री. अंकुशदादा वसंत कुराडे यांचे समवेत जागा पाहणी केली. सदर तक्रारदार यांनी दाखविलेली जागा ही कन्नमवार नगर, SWD नाल्याच्या शेजारी, मुंबई आग्रा रोड, विक्रोळी पुर्व, येथे येत असून मौजे कांजुर मधील स. क्र. २७५ मध्ये येत आहे. सदर ठिकाण मुंबई आग्रा रोडच्या पुर्व बाजूस असून त्यामधून मुंबई महानगर पालिकेचा नाला वाहत आहे. त्या नाल्याच्या दोन्ही बाजुस कांदळवन असून सदर जागा वन विभाग यांच्या ताब्यात असल्याचे तेथे हजर असलेल्या वनरक्षक श्री सागरे यांनी सांगितले. पाहणीवेळी तेथे असे निदर्शनास आले की सदर नाल्यातुन मुंबई महानगर पालिका यांचेमार्फत गाळ काढण्याचे काम सुरू होते व त्या कामासाठी तेथे जे.सी.बी व डंपर होते व गाळ बाहेर काढण्यात आलेला होता. तसेच तेथे काही जागेवर रॅबिट टाकण्यात आल्याचे दिसून आले. तसेच सदर ठिकाणी मुंबई आग्रा रोडला लागून वन विभाग यांचेमार्फत संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरू होते.

तक्रारदार यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे MMRC ON MMRCL DUTY, DOGUS SOMA JV,PACKAGE-३ या प्रकल्पामध्ये तयार होणा-या कचरा, गाळमिश्रीत पाणी सदर नाल्यात टाकत असल्याने DOGUS SOMA JV या कंपनीवर भारतीय दंड संहिता व इतर कायदयानुसार फौजदारी गुन्हे दाखल करावे असे नमुद केलेले आहे. परंतु स्थळपाहणी करतेवेळी DOGUS SOMA JV कंपनीचे कोणीही व्यक्ती जागेवर हजर नव्हते तसेच नाल्यामध्ये कोणत्याही कचरा, गाळमिश्रीत पाणी दिसून आले नाही. सदर नाल्यातील पाणी पुढे कांदळवनातून वाहत असल्याचे दिसून आले परंतु नाल्यात तक्रारदार यांनी दाखविलेल्या ठिकाणी प्रत्यक्षात जाण्यासाठी पायवाट व रस्ता नाल्याच्या बाजूने नसल्यामुळे तेथे जाणे शक्य झाले नाही. तसेच तेथे कांदळवनाचा -हास झाल्याचे दिसून आले नाही. वन विभागाच्या वनरक्षक श्री सागरे यांना सदर घटनेबाबत विचारणा केली असता सदर जागा आमच्या ताब्यात असून दि. ०५/०२/२०२० रोजी तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीवरून प्रत्यक्ष त्यादिवशी जागेवर आले असता आम्हांला मुंबई आग्रा रोडच्या पश्चिम दिशेला नाल्यात पाणी सोडताना गाडी आढळून आली त्या गाडीवर आमचेमार्फत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच कांदळवनाचा कोणताही -हास झालेला नाही.असेही सांगण्यात आले. तरी सदर प्रकरणी तक्रारदार यांनी दाखविलेली जागा ही वनविभागाच्या ताब्यात असल्याने त्याचे संरक्षण त्यांचेमार्फत करण्यात येत आहे. तरी सदर प्रकरणी तक्रारदार यांचा जबाब, संयुक्त स्थळपाहणी पंचनामा सोबत सादर करीत आहे. तरी प्रकरण पुढील कार्यवाहीकरीता सविनय सादर करण्यात येत आहे.

TA... KURLA (MULUND)
In... 4057
Date 23/12/2020
Clerk ...

775

(सही)
मंडळ अधिकारी घाटकोपर
तालुका-कुर्ला

398

Scanned by CamScanner

# जबाब

कांदळवन सनियंत्रीत गठित समिती कुर्ला यांचे सदस्यासमोर जबाब लिहुन देणार श्री.अंकुशदादा वसंत कुऱ्हाडे, राष्ट्रीय अध्यक्ष् स्वाभिमानी भारतीय पँथ वय --- वर्षे राहणार - रूम नं.००१,बिल्डींग नं ०५, यश कॉ.ऑप.हौ.सो., एम.एम.आर.डी.ए. वसाहत, कांजूरमार्ग (प), मुंबई ४०००७८.

आज दि. ०४/१२/२०२० रोजी जागेवर हजर राहुन विचारलेवरुन जबाब लिहुन देतो की, मी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे दिनांक २८/१०/२०२० रोजी जाणीवपूर्वक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नाल्यात कचरा टाकून, संरक्षित कांदळवनाच्या ऱ्हासास कारणीभूत असलेल्या DOGUS SOME JV या कंपनीवर भारतीय दंड संहिता व इतर कायदयानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्याबाबत इमेलद्वारे तक्रार अर्ज केलेला आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आज रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, मंडळ अधिकारी, घाटकोपर, तलाठी सजा कांजूर, एस विभागाचे कर्मचारी व नगर भूमापन कार्यालयातील परिरक्षक भूमापक यांचेसमवेत स्थळपहाणी केली. पाहणी दरम्यान सदर नाला हा इस्टर्न एकसप्रेस हायवेच्या पूर्वेस कन्नमवार नगर २, विक्रोळी येथून वाहत असुन सदर नाल्याच्या बाजूस कांदळवनाची झाडे आहेत. सदर नाल्यातुन बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेमार्फत गाळ काढण्याचे काम सुरु असून नाल्यातुन काढलेला गाळ सर्वत्र पसरलेला आहे. तसेच काही जागेवर डेब्रीज टाकण्यात आलेले आहे. तसेच हायवे लगत नाल्याच्या दोन्ही बाजुस काही अंतरापर्यंत विरळ प्रमाणत कांदळवनाची झाडे आहेत. सदर नाल्यातुन वाहणारे पाणी हे पुढे कांदळवन क्षेत्रात वाहत जात आहे. त्या पाण्यामध्ये DOGUS SOME JV यां कंपनीमार्फत बांधकामाचे सांडपाणी, सिमेंट व रॉ मटेरीयल, मिक्स पाणी सोडण्यात आले होते. सदर सांडपाणी कांदळवण्याच्या झाडाच्या मुळाशी जावून अडकल्याने कांदळवण्याच्या मुळाशी सिमेंटचा थर जमा झालेला आहे. त्यामुळे झाडाला व्यवस्थीत पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे कांदळवण नष्ट होवू शकते. असे माझे म्हणणे आहे . सदरची जागा वन विभागाच्या ताब्यात असून त्यांच्या मार्फत संरक्षण भिंत बांधण्याचे काम चालु आहे. तरी उपरोक्त कंपनीवर भारतीय दंड संहिता व इतर कायद्यानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश द्यावे ही विनंती. सदरचा जबाब टंकलीखीत केला असून तो मी वाचुन पाहिला तो बरोबर आहे



Scanned by CamScanner

मंडळ अधिकारी घाटकोपर तलाठी सजा कांजूर नगर भूमापन कार्यालय मुलुंडचे परिरक्षक भूमापक व वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे समोर पंचनामा लिहून देणार आम्ही पंचलोक राहणार खालीलप्रमाणे

① श्री. तानाजी तोरणे वय. ४२ वर्षे
रा. स्वयंभू हनुमान नगर
कन्नमवार नगर विक्रोळी (पू) # 7506539265

②

①

आज रोजी समक्ष राहून आम्ही पंचलोक पंचनामा लिहून देतो की, स्वाभिमानी भारतीय पक्षाचे अध्यक्ष - श्री अंकुश वसंत कुऱ्हाडे यांनी मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे दिनांक २८/१०/२०२० रोजी मुंबई महानगर पालिकेच्या नाल्यात कचरा टाकून संरक्षित कांदळवनाच्या ऱ्हासास कारणीभूत असलेल्या DOGUS SOME JV या कंपनीवर भारतीय दंड संहिता व इतर कायद्यानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्याबाबत ईमेलद्वारे तक्रार अर्ज केलेला आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने आज दि. ०४.१२.२०२० रोजी प्रत्यक्ष जागेवर स्थळपाहणी करणेसाठी वनपरिक्षेत्र कर्मचारी, मंडळ अधिकारी घाटकोपर, तलाठी सजा कांजूर, मुंबई महानगरपालिका एस विभागाची कर्मचारी व नगर भूमापन कार्यालयातील परिरक्षक भूमापक तसेच तक्रारदार हजर होते. संयुक्त पाहणी दरम्यान असे निदर्शनास आले की, ईस्टर्न एक्सप्रेस हायवेच्या पूर्वेस कन्नमवार नगर नं. २ विक्रोळी येथून नाला वाहत असून

Scanned with CamScanner
Scanned by CamScanner

सदर नाल्यांच्या बाजूस कांदळवनाची झाडे आहेत. नाल्यातून मुंबई महानगरपालिकेच्या वतीने गाळ काढण्याचे काम सुरु असून नाल्यातून काढलेला गाळ हा सर्वत्र पसरलेला आहे. तसेच काही जागेवर डेब्रीज टाकण्यात आलेले आहे. तसेच हायवे लगत नाल्याच्या दोन्ही बाजूस काही अंतरापर्यंत विरळ प्रमाणात कांदळवनाची झाडे आहेत. सदर नाल्यातून वाहणारे पाणी हे पुढे कांदळवन क्षेत्रातून वाहत जात आहे. त्या पाण्यामध्ये DOGUS SOME JV या कंपनीमार्फत बांधकामाचे सांडपाणी, सिमेंट व रॉ मटेरियल मिक्स पाणी सोडण्यात आले होते. सदर सिमेंटमिश्रीत गाळ व पाणी कांदळवनाच्या झाडाच्या मुळाशी जाऊन अडकल्याने कांदळवनाच्या मुळाशी सिमेंटचा थर जमा झालेला आहे, त्यामुळे झाडाला व्यवस्थित पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे कांदळवनाचा ऱ्हास होऊ शकतो असे तक्रारदार यांचे म्हणणे आहे. परंतु प्रत्यक्ष स्थळपाहणी करतेवेळी DOGUS SOME JV या कंपनीचे कोणीही कर्मचारी जागेवर हजर नव्हते. तसेच सदर नाल्यातील पाण्यात बांधकामचे सांडपाणी सिमेंट व रॉ मटेरियल मिक्स पाणी सोडल्याचे दिसून आलेले नाही. अर्जदार यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जेथे पाणी जमा होत आहे तेथे पोहोचणेस पायवाट व रस्ता नसल्यामुळे शक्य झालेले नाही

सतेच सदर ठिकाणी तक्रारदार यांनी या प्रकरणी वनविभाग यांना सदर घटनेची माहिती यापूर्वीच दिली होती व त्यांनी त्याबाबत तक्रार ही नोंदविली आहे असे सांगितले. त्याबाबत वनपरिक्षेत्र यांचे हजर असलेल्या कर्मचारी यांना विचारणा केली असता

क्र.म.प.

आम्ही या घटनेबाबत ट्रक चालकावर गुन्हा दाखल केलेला आहे, असे समजते. तसेच सदरचे क्षेत्र हे मौजे कांजूर येथील स.नं २७५ मधील असून जागेवर कांदळवन असल्यामुळे आमच्या ताब्यात आहे. तसेच सदर ठिकाणी तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारच्या कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही, तसेच सदर जागेस इस्टर्न एक्सप्रेस हायवेलगत आमच्ये मार्फत संरक्षण भिंत बांधण्यात येत असल्याचेही वनपरिक्षेत्र यांच्या हजर असलेले कर्मचारी श्री. सागरे यांनी स्थळपाहणी वेळी सांगितले. तरी सदरचा पंचनामा आम्ही येथे लिहून दिला असे तो वाचून दाखविला व समजावून सांगितला तो आम्हाला मान्य आहे.

समक्ष

पंच

[signature]
मंडळ अधिकारी घाटकोपर

१) [signature]
(श्री. मानाजी तोरणे)

२)

[signature]
तलाठी कांजूर

[signature]
प.क्र.३

[signature]
वरकांजूर

Scanned by CamScanner

भा. व. अधिनियम १९२७ चे कलम ५१, २६(१) अं, ड ई. ६४, ६५

* विभागीय वन अधिकाऱ्यास पाठवावयाचे

* परिमंडल अधिकाऱ्यास पाठवावयाचे

आरोपी-(१) मुल. वसीम अहमद मसीउद्दीन अली

(२) सिराज अहमद इसाहक अहमद - वय वर्षे-२०

* कार्यालयीन प्रत

* दुसरी प्रत

तिसरी प्रत

चौथी मूळप्रत

(14) कन १२८

128

# वन अपराध पहिले प्रतिवृत्त

क्र.०५ दि.05-2-2020 (परिमंडल अधिकाऱ्याने द्यावयाचा तपशील)

दाखल दि.05-2-2020 Range Forest Officer

नियतक्षेत्र- कांजूर परिमंडल- मुलुंड रवाना दि.06-2-2020 Thane Creek Flamingo Sanctuary Airoli

परिमंडल अपराध अनुक्रमांक- इ. 10 दि.05-2-2020

अपराधाचा तपशील आज रोजी रेंज स्टाफ ठाणे आणि प्रोजेक्ट अधिकारी कोर्ट व मध्य मुंबई रेंज स्टाफ यांचेसह रात्र गस्त घालत असताना सर्वे नं. २७५ न.भू.मा.क्र. ६५७(अ) कांजूर कांदळवन क्षेत्रामध्ये नाल्यात मासे मिश्रीत सिमेंट चे पाणी सोडताना वाहन जप्त करून रेंज कार्यालय येथे आणून उभे केले आहे.

(सही)

वनपाल मुलुंड

परिमंडल रक्षक किंवा वनपाल.

कोठे घडला-

ते गुन्हा काय व्यवस्था केली- वनगुन्हा नोंदवून कागदपत्र तयार केले,

दाखल दि.

माल अडकवला-

विभागीय आदेश क्र.

त्याची व्यवस्था काय केली-

विभागीय अपराध नोंदवही क्र.--

मुक्काम मुलुंड - दि.05-2-2020

(सही)

विभागीय वन अधिकारी

.................. भाग

(सही)

वनपाल मुलुंड

* आवश्यक ते ठेवावे.

Scanned by CamScanner

भा. व. अधिनियम 1927 चे कलम 51, 26(1) अ, ड ई. 64, 65

* विभागीय वन अधिकाऱ्यास पाठवावयाचे

* परिमंडल अधिकाऱ्यास पाठवावयाचे

* कार्यालयीन प्रत

* दुसरी प्रत

तिसरी प्रत

चौथी मूळप्रत

आरोपी :- (1) श्री. वसीम अहमद मनोव्वर अली - वाहन चालक

(2) सिराज अहमद इसाहक अहमद - वय वर्षे - 20

वन अपराध पहिले प्रतिवृत्त R/R/10

क्र. 04 दि. 05-2-2020

(परिमंडल अधिकाऱ्याने द्यावयाचा तपशील)

नियतक्षेत्र - कांजूर परिमंडल - मुलुंड

दाखल दि. 05-2-2020

रवाना दि. 06-2-2020

परिमंडल अपराध अनुक्रमांक - 10 दि. 05-2-2020

Range Forest Officer
Thane Creek Flamingo Sanctuary
Airoli

अपराधाचा तपशील आज रोजी रेंज स्टॉफ ठाणे व भांडुप पश्चिम वनपरिक्षेत्र कर्मचारी व पश्चिम मुंबई रेंज स्टॉफ यांचेसह रात्र गस्त घालीत असताना। सर्वे नं. 275 न.भू.मा.क्र. 657 (अ) कांजूर कांदळवन क्षेत्रातील नाल्यात मासे मिळणीचे सिमेंटचे पाणी सोडताना वाहन जप्त करून रेंज कार्यालय येथे आणून उभे केले आहे।

(सही)

वनपाल मुलुंड

परिमंडल रक्षक किंवा वनपाल.

कोठे घडला

* गार्ड काय व्यवस्था केली - वनगुन्हा नोंदवून कागदपत्र तयार केले।

दाखल दि.

माल अडकवला -

विभागीय आदेश क्र.

त्याची व्यवस्था काय केली -

विभागीय अपराध नोंदवही क्र. --

मुक्काम मुलुंड - दि. 05-2-2020

(सही)

विभागीय वन अधिकारी

........ भाग

(सही)

वनपाल मुलुंड

* आवश्यक ते ठेवावे.

Scanned by CamScanner